# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** १३२ — **विभाग : वैद्यकीय आरोग्य**
**दिनांक :** २८/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, कोव्हीड-१९ रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाची सेवा समाप्त होत असल्याने कोव्हीड-१९ ची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी वर्गाची सेवा समाप्ती करणे व १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन त्यांना पुढील ६ महिन्यासाठी मुदतवाढ देऊन आदेश देणेकामी तसेच याकामी वेतनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई व विजयनगर-तुळींज रुग्णालय, नालासोपारा अशी २ रुग्णालये व १ सुपरस्पेशालिटी पॉली क्लिनिक कार्यरत आहेत. तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ३ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयाचे/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे व दवाखान्याचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. तसेच शासनाने कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी निगर्मित केलेल्या सूचनांचे अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) या आजाराचा संसर्ग रोखण्यासाठी विविध ठिकाणी कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड रुग्णालये स्थापन करण्यांत आली आहे. महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाचे कामकाजासाठी विविध विषयांमधील तज्ञ वैद्यकीय अधिकारी, एम.बी.बी.एस वैद्यकीय अधिकारी, बी.ए.एम.एस वैद्यकीय अधिकारी, पी.एच.एन., जी.एन.एम., ए.एन.एम., फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक, क्ष-किरण सहाय्यक, समुपदेष्टा, समाजसेवक, डायलेसीस सुपरवायझर, डायलेसीस तंत्रज्ञ व शितसाखळी तंत्रज्ञ या पदांची आवश्यकता आहे. महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने आवश्यक असलेला वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग दरमहा मानधनावर नियुक्त करणे कामी आवश्यक पद निर्मिती करणेस व आवश्यक ती प्रक्रिया करुन पुढील कार्यवाही करणेस तसेच महानगरपालिकेमध्ये पुर्वी पासुन कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना या पदावर नियुक्ती कामी विहित केलेली वयोमर्यादेची अट न ठेवणेस मा.महासभा दि.०६/०३/२०१७ ठराव क्र.१२ अन्वये मान्यता दिलेनुसार सदरच्या पदावर आवश्यक वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दि.२४/०४/२०१७ ते दि.२६/०४/२०१७ रोजी थेट मुलाखती घेऊन निवड समितीने निवड केलेले वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास नियुक्त करण्यांत आलेले होते. तथापि मा. सर्वसाधारण सभा दि.१५/११/२०१८ ठराव क्र.२० अन्वये रिक्त असलेली पदे थेट मुलाखती द्वारे भरती करणेकामी मंजूरी दिलेनुसार सदरची रिक्त पदे ही वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दि.२८/०१/२०१९ ते दि.२९/०१/२०१९ रोजी थेट मुलाखती घेऊन नियुक्त करण्यांत आलेले आहेत. तसेच वरील नमूद पदांना मा. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने वेळोवेळी मान्यता घेऊन विभागाची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता सर्व पदांच्या नेमणूका १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ६ महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यांत आलेनुसार वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग हजर झाले असून या सर्व पदांवरील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाचा ६ महिन्यांचा कंत्राटी पध्दतीचा सेवा कालावधी संपृष्टात आल्याने सदर पदांच्या थेट मुलाखती घेणेकामी

मा.सर्वसाधारण सभा दि.१३/१२/२०१९ ठराव क्र.११ अन्वये मान्यता दिलेनुसार वरील सर्व पदांवर आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दि.२६/०२/२०२० ते २८/०२/२०२० रोजी थेट मुलाखती घेण्यांत आलेल्या होत्या तथापि याच दरम्यान कोव्हीड-१९ चा उद्रेक सुरु झाल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजनेची तातडीने अंमलबजावणीचे वैद्यकीय आरोग्य विभागाकडील अतितात्काळ महत्वाचे कामकाज सुरु असल्याने सर्व कर्मचारी वर्ग याकामी कार्यरत होते. त्यामुळे महानगरपालिकेने माहे फेब्रुवारी २०२० मध्ये घेतलेल्या थेट मुलाखतीचे निकालाचे कामकाज स्थगित करुन कोरोना विषाणुवर प्रादुर्भाव रोखण्याच्या उपाय योजनांवर त्याचा परिणाम होऊ नये म्हणून वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत असलेले सर्व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास ६ महिन्याचा सेवा कालावधी संपुष्टात आल्याने १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुढील ६ महिन्यासाठी कार्यरत सर्व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या कंत्राटी पध्दतीच्या नेमणूका पुढे सुरु ठेवणेस मा.सर्वसाधारण सभा दि.१६/०३/२०२० ठराव क्र.१९ अन्वये मंजूरी दिलेली आहे. तथापि कोव्हीड-१९ चे कामकाजासाठी वैद्यकीय अधिकारी आवश्यक असल्याने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दि.१६/०३/२०२० अन्वये माहे फेब्रुवारी २०२० चे मुलाखती मधील फक्त एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी यांचे निकालाचे कामकाज करुन निवड समितीने निवड केलेले वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) वर्ग दि.२४/०३/२०२० रोजीचे आदेशान्वये ६ महिन्यांचा कालावधी नियुक्त करण्यांत आलेल्या पदांचा ६ महिन्यांचा कंत्राटी पध्दतीचा सेवा कालावधी संपुष्टात आल्याने सदर पदांना १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन मा. प्रशासकीय ठराव क्र.१२३ दि.२२/०९/२०२० व मा. प्रशासकीय ठराव क्र.६७१ दि.२६/०३/२०२१ अन्वये पुढील ६ महिन्याच्या कालावधी साठी मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच दि.३०/०५/२०२० रोजीच्या नियुक्ती आदेशानुसार वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग हजर झालेनुसार या पदांचा ६ महिन्यांचा कंत्राटी पध्दतीचा सेवा कालावधी संपुष्टात आल्याने १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मा.प्रशासकीय ठराव क्र.२३३ दि.१९/११/२०२० अन्वये पुढील ६ महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत नियुक्त केलेल्या ए.एन.एम. यांची पदे रद्द केल्याने महानगरपालिकेकडे मा. सर्वसाधारण सभा दि.२०/०१/२०२० ठराव क्र.२३ अन्वये वर्ग केलेल्या ए.एन.एम.-४ पदांना ६ महिन्यांचा कंत्राटी पध्दतीचा सेवा कालावधी समाप्त झाल्याने सदर पदांना १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन मा. प्रशासकीय ठराव क्र.१४ दि.२१/०७/२०२०, मा. प्रशासकीय ठराव क्र.६६२ दि.२५/०३/२०२१ अन्वये पुढील ६ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सेवा घेणेकामी मुदतवाढ देण्यात आली आहे. मा.प्रशासकीय ठराव क्र.३६३ दि.१४/०१/२०२१ अन्वये वैद्यकीय अधिकारी संवर्गातील रिक्त असलेली पदे थेट मुलाखती द्वारे भरती करणेकामी मान्यता दिलेनुसार सदरच्या पदावर आवश्यक रिक्त पदे वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दि.२८/०१/२०२१ ते दि.२९/०१/२०२१ रोजी थेट मुलाखती घेऊन निवड केलेले वैद्यकीय अधिकारी वर्गास नियुक्त करण्यांत आलेले आहेत. सबब नव्याने नियुक्ती करण्यांत आलेले तसेच पुनर्नियुक्ती आदेशानुसार संबंधित वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी हजर झालेनुसार सदयस्थितीत खालील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी महानगरपालिकेची रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, सुपरस्पेशालिटी पॉली क्लिनिक, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने, कोव्हीड-१९ लसीकरण केंद्रे, कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, कोव्हीड हेल्थ सेंटर व कोव्हीड-१९ रुग्णालये येथे कार्यरत आहेत.

| अ.क्र. | पद | महानगरपालिका एकूण कार्यरत पदे (कंत्राटी) | दरमहा मानधन रु. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | भिषक | ०५ | ८५,०००/- |
| २ | स्त्रीरोग तज्ञ | १२ | ८५,०००/- |
| ३ | पॅथॉलॉजीस्ट | ०२ | ८५,०००/- |
| ४ | बालरोग तज्ञ | ०९ | ८५,०००/- |
| ५ | अस्थिरोग तज्ञ | ०२ | ८५,०००/- |
| ६ | शल्य चिकित्सक | ०२ | ८५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | कान, नाक, घसा तज्ञ | ०२ | ८५,०००/- |
| ८ | नेत्र शल्यचिकित्सक | ०२ | ८५,०००/- |
| ९ | त्वचा व गुप्तरोग तज्ञ | ०२ | ८५,०००/- |
| १० | नेफ्रॉलॉजीस्ट | ०१ | ८५,०००/- |
| ११ | वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. | ०२ | ७५,०००/- |
| १२ | वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस. | ७५ | ५०,०००/- |
| १३ | पी.एच.एन. (सार्वजनिक आरोग्य परिचारीका) | ०५ | ३५,१००/- |
| १४ | जी.एन.एम.(अधिपरिचारीका) | १३५ | ३४,८००/- |
| १५ | ए.एन.एम. (प्रसविका) | १८९ | १९,७००/- |
| १६ | फार्मासिस्ट | ३७ | २०,८००/- |
| १७ | प्रयोगशाळा सहाय्यक | ४४ | १८,७००/- |
| १८ | क्ष-किरण सहाय्यक | ०८ | १८,७००/- |
| १९ | शितसाखळी तंत्रज्ञ | ०१ | १९,७००/- |
| २० | डायलेसीस सुपरवायझर | ०१ | ३४,८००/- |
| २१ | डायलेसीस टेक्निशीयन | ०२ | ३४,८००/- |
| २२ | समुपदेष्टा/समाजसेवक | ०५ | ३५,१००/- |

यानुसार मा. प्रशासकीय ठराव क्र.२३३ दि.१९/११/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यांत आलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाचा ६ महिन्यांचा सेवा कालावधी साधारणत: दि.२६/०५/२०२१ रोजी व मा. प्रशासकीय ठराव क्र.६६२ दि.२५/०३/२०२१ अन्वये दि.२१/०१/२०२१ पासून पूर्वलक्षीप्रभावाने मुदतवाढ देण्यांत आलेल्या ए.एन.एम.-४ पदांचा ६ महिन्यांचा सेवा कालावधी साधारणत: माहे २२ जुलै २०२१ व मा. प्रशासकीय ठराव क्र.३६३ दि.१४/०१/२०२१ अन्वये वैद्यकीय अधिकारी संवर्गातील भरण्यांत आलेल्या रिक्त पदांवरील वैद्यकीय अधिकारी विविध दिनांकास हजर झालेनुसार या सर्वांचा ६ महिन्यांचा सेवा कालावधी साधारणत: माहे ऑगस्ट २०२१ रोजी विविध दिनांकास समाप्त होत आहे. सबब या सर्व कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाचा सेवा कालावधी विविध दिनांकास समाप्त होत असल्याने त्यांचा सेवा कालावधी हा प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने दि.२२/०५/२०२१ रोजी या एकाच दिवशी कोव्हीड-१९ चे अत्यावश्यक कामकाज सुरु असल्याने समाप्त करणे आवश्यक आहे. व तसा आदेश संबंधितांना निर्गमित करणे योग्य होईल.

सदयस्थित कोव्हीड-१९ विषाणू संभाव्य तिसऱ्या लाटेची शक्यता असल्याने व महानगरपालिका क्षेत्रात म्युकरमायकोसिस या आजाराचे रुग्ण आढळून आल्याने पुढील धोका लक्षात घेऊन या आजारावर उपचारासाठी पूर्वतयारी करणे आवश्यक असल्याने सदरची पार्श्वभूमी लक्षात घेता या सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे. तथापि उपरोक्त नमुद सर्व पदावरील थेट मुलाखती आयोजन केल्यास याकामी अंदाजे किमान ३००० ते ३५०० इतक्या येणाऱ्या उमेदवारांची गर्दीमुळे व सोशल डिस्टेस्टींग न पाळल्यामुळे रुग्णांच्या संख्येत वाढ होण्याची दाट शक्यता आहे. सबब सदरचा संभाव्य धोका लक्षात घेऊन सदयस्थित कार्यरत उपरोक्त नमूद केलेल्या या सर्व कार्यरत वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास दि.२३/०५/२०२१ रोजी एक दिवसांचा तांत्रिक खंड देऊन कोव्हीड-१९ चे अत्यावश्यक कामाची गरज लक्षात घेऊन या सर्व कार्यरत वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गांना दि.२४/०५/२०२१ रोजी पासून पुढील ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. व तसा आदेश संबंधितांना निर्गमित करणे योग्य होईल. याकामी सोबत जोडलेल्या प्रपत्र क्र.१ मध्ये नमुद वेतनापोटी सहामाही अंदाजे रु.११,१७,१०,४०० इतका खर्च अपेक्षित असुन सदरचा खर्च सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात "वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय सेवा व्यवस्थापन ठेका" या

लेखाशिर्षाखाली रु.३१,२१,५०,०००/- या तरतुदी मधून भागविता येईल. तरी सदरचा विषय प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत कार्यरत रुग्णालये, कोव्हीड-१९ रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या विविध विषयांमधील तज्ञ वैद्यकीय अधिकारी-३९, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस.-०२, वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस.-७५, पी.एच.एन.-०५, जी.एन.एम.-१३५, ए.एन.एम.-१८९, फार्मासिस्ट-३७, प्रयोगशाळा सहाय्यक-४४, क्ष-किरण सहाय्यक-०८, समुपदेष्टा-०३, समाजसेवक-०२, डायलेसीस सुपरवायझर-०१, डायलेसीस तंत्रज्ञ-०२ व शितसाखळी तंत्रज्ञ-०१ या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाचा ६ महिन्याचा सेवा कालावधी हा विविध दिनांकास समाप्त होणार असल्याने या सर्वांचा ६ महिन्यांचा सेवा कालावधी हा दि.२२/०५/२०२१ या एकाच दिवशी समाप्त करणेस व दि.२३/०५/२०२१ रोजी १ दिवसाचा तांत्रिक खंड देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा व कोव्हीड-१९ चे कामकाजाची अत्यावश्यकता लक्षात घेऊन या सर्व विविध विषयांमधील तज्ञ वैद्यकीय अधिकारी-३९, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस.-०२, वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस.-७५, पी.एच.एन.-०५, जी.एन.एम.-१३५, ए.एन.एम.-१८९, फार्मासिस्ट-३७, प्रयोगशाळा सहाय्यक-४४, क्ष-किरण सहाय्यक-०८, समुपदेष्टा-०३, समाजसेवक-०२, डायलेसीस सुपरवायझर-०१, डायलेसीस तंत्रज्ञ-०२ व शितसाखळी तंत्रज्ञ-०१ यांना दि.२४/०५/२०२१ पासून पुढील ६ महिन्यांच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी वेतनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

२१/५/०५

(सतिश लोखंडे)
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९३३

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : 28/05/2021

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोरोना बाधित रुग्णांकरीता सद्यस्थितीत कार्यरत व नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या कोव्हीड केअर सेंटर ,कोव्हीड रुग्णालये येथे आवश्यक BiPap Machines विनानिविदा खरेदी करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. सद्यस्थितीत कारोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता सद्यस्थितीत कार्यरत व नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या कोव्हीड केअर सेंटर ,कोव्हीड रुग्णालये येथे आवश्यक BiPap Machines खरेदी करणे अत्यावश्यक आहे. सदर उपकरणे तातडीने खरेदी करणे कामी महाराष्ट्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५.२.२ अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल. याकामी इंटरनेटद्वारे व इतर काही कंपनीचे दर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वितरकाचे नाव | दर |
|---|---|---|
| १. | M/s.Naturals Smart Solutions Pvt.Ltd.Miraroad | १,४९,०००/-+ जी.एस.टी.- १२% |
| २. | M/s.ADN Fire Safety Pvt.Ltd.,Andheri | ८०,१००/- + जी.एस.टी.- १२% |
| ३. | M/s.H.K.Pharama, Bhiwandi | ७०,०००/- + जी.एस.टी.- १२% |
| ४. | M/s.Ashok Enterprises | ९०,०००/- + जी.एस.टी.- १२% |

सबब M/s.H.K.Pharama, Bhiwandi यांनी सोबत जोडलेले दरपत्रक हे कमी दराचे असुन १ वर्षाच्या वॉरंटी सहीत सादर केलेले आहे. याबाबतचा दरासह तपशिल खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र. | उपकरणाचे नाव | वितरकाचे नाव | दर | मागणी | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | BI-PAP Machine DS-8,ST30 Modes-C-PAP,Auto 1 Yrs.Warranty | M/s.H.K.Pharama Bhiwandi | रु.७०,०००/- | १०० नग | ७०,००,०००/- |
| | | | | जी.एस.टी.- १२% | रु.८,४०,०००/- |
| | | | | एकुण | रु.७८,४०,०००/- |

यानुसार BiPap Machines M/s.H.K.Pharama, Bhiwandi या वितरकांकडून प्राप्त दरपत्रकातील दरांबाबत मा.आयुक्त महोदयांशी झालेल्या चर्चेनुसार सदरचे BI-PAP Machine DS-8,ST30 Modes-C-PAP,Auto1 Yrs.Warranty उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. कोरोना विषाणू संसर्गाची वाढती संख्या लक्षात घेता १०० नग तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. सदरकामी रक्कम रु.७८,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात "ऑक्सिजन सिलेंडर रिफीलींगसह रुग्णालयातील उपकरणे खरेदी व देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखाली रु.६,००,००,०००/- तरतुद करण्यात आली असुन या तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे. तरी सदरचे BI-PAP Machine DS-8,ST30 Modes-C-PAP,Auto1 Yrs.Warranty विनानिविदा खरेदी करणे कामी सदरचा विषय प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

ठराव - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार M/s.H.K.Pharama, Bhiwandi यांचेमार्फत BI-PAP Machine खरेदी करण्यास येणाऱ्या रक्कम रु.७८,४०,०००/- (अक्षरी- अठ्ठ्याहत्तर लाख चाळीस हजार रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcoporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.:- २३४

विभाग : जाहिरात विभाग
दिनांक :२८/०५/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा. उच्च न्यायालय,मुंबई यांनी नेमणुक केलेल्या ॲड. श्री. अभिजित कुलकर्णी, यांची (सोल अर्बिट्रेटर) लवाद नेमणुकचे देयक बिल अदा करणेकामी होणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या जाहिरात धोरण व अंमलबजावणी संदर्भात स्थायी समिती सभा ठराव क्र.४८४ दि.१२/१/२०१८ रोजीने मंजुरी मिळाली असून मे.विजास डिजिटल (इं) प्रा.लि. मुंबई यांचेसमवेत दि.१८/४/२०१८ रोजी करारनामा करुन त्यास कार्यादेश देण्यात आलेला आहे मे.विजास डिजिटल(इं) प्रा.लि. मुंबई यांनी निविदा प्रपत्रातील क्रारनाम्यातील अटी व शर्तीच्या योग्यरित्या पालन न केल्याने मा.आयुक्त सो. यांचे सुचनेनुसार प्रशासकीय ठराव क्र.२२८ दि.१८/११/२०२० अन्वये उक्त निविदा प्रक्रिया कायमस्वरुपी रद्द करणेबाबत निर्णय घेण्यात आला त्यानुसार मे.विजास डिजिटल (इं) प्रा.लि. मुंबई यांना करारनामा रद्द करणेबाबत व प्रदेय भरणा करणेबाबत नोटीस बजावण्यात आलेली आहे. या विरोधात मे.विजास डिजिटल (इं.) प्रा.लि.मुंबई यांनी मा.जिल्हा न्यायालय ठाणे, येथे मनपाच्या विरोधात दावा दाखल केला होता.

सदर दाव्यामध्ये मा.जिल्हा सत्र न्यायालय ठाणे, यांनी दि.१४/१२/२०२० रोजीच्या आदेशान्वये सदर निविदेस ९० दिवसांचा मनाई हुकुमाचा आदेश पारीत केला होता.तद्नंतर मे.विजास डिजिटल (इं) प्रा.लि. मुंबई यांनी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विरुध्द मा. उच्च न्यायालय,मुंबई येथे लवाद याचिका क्र.१३७८/२०२१ दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने दि.२३/२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये ॲड. श्री. अभिजित कुलकर्णी, (सोल अर्बिट्रेटर) लवाद म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे

शासनाने मा. लवाद यांचे फी धोरणासंदर्भात तयार करण्यात आलेले नियम (The Bombay high court (fee payable to Arbitrators Rules,2018)महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-क, दि. २५/०४/२०१९ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. या नियमांना जोडण्यात आलेले प्रपत्रामध्ये विवादित रक्कमेच्या प्रमाणानुसार मा. लवाद यांस देय असलेले फी दर नमूद आहेत दाव्यातील विवादित रक्कम रु.१,००,००,०००/- ते रु.१०,००,००,०००/- पर्यंत असल्यास मा. लवाद यांस देय फीची रक्कम रु.३,३७,५००/- अधिक रु.१००,००,०००/- वरील दावा रक्कमेच्या १% रक्कम असे दर नमूद आहे.

उक्त प्रकरणी मा. लवाद ॲड. श्री. अभिजित कुलकर्णी यांचेकडे दाखल दाव्याची विवादित रक्कम रु.१,४४,०८,०००/-इतकी आहे. उक्त नियमानुसार संदर्भिय दाव्याकरीता मा. लवाद ॲड. श्री.अभिजित कुलकर्णी यांची एकूण फी रक्कम रु.३,८१,५८०/-(अक्षरी-रु. तीन लक्ष ऐंक्याऐंशी हजार पाचशे ऐंशी मात्र) [337500+44,080 (म्हणजेच 1% of रु.44,08,000/-) = 381580] इतकी होत आहे.

संदर्भिय दाव्याच्या प्रकरणी मा. लवाद ॲड. श्री. अभिजित कुलकर्णी (सोल अर्बिट्रेटर) यांचेकडे दि.०९/०४/२०२१ रोजी सुनावणी झालेली आहे. या सुनावणीमध्ये मा. लवाद श्री. अभिजित कुलकर्णी यांनी दोन्ही पक्षकारांस (म्हणजेच मे.विजास डिजिटल (इं) प्रा.लि.मुंबई व वसई विरार शहर महानगरपालिका) प्रत्येकी रु.१,००,०००/- (अक्षरी- रक्कम रुपये एक लक्ष मात्र) लवाद फी पैकी भाग अदायकी म्हणुन जमा करणेचे निर्देश दिलेले आहेत. सदरचा खर्च हा **"दावे व खटले फी"** या लेखाशिर्षकातुन करण्यात येईल.

तथापि मा. लवाद श्री. अभिजित कुलकर्णी यांस संदर्भिय प्रकरणी देय होणारी एकूण फी रक्कम रु.३,८१,५८०/- पैकी नियमानुसार महानगरपालिकेकडून देय असलेली ५०% भाग अदायकी रक्कम रु.१,९०,७९०/-( अक्षरी- एक लक्ष नव्वद हजार सातशे नव्वद मात्र) इतकी होत आहे.त्यानुसार मा.लवाद श्री. अभिजित कुलकर्णी यांस नियमानुसार टप्पेनिहाय फी रक्कम अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**प्रस्तावाचा ठराव :-** उक्त प्रस्तावाचे अवलोकन करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे मे. विजास डिजिटल (इं.) प्रा.लि. मुंबई प्रकरणी मा. लवाद श्री.अभिजित कुलकर्णी यांचेकडे न्यायप्रविष्ठ प्रकरणी मा. लवाद यांस देय होणारी एकूण फी रक्कम रु.३,८१,५८०/- पैकी नियमानुसार महानगरपालिकेकडून देय असलेली ५० % भाग अदायकी रक्कम रु.१,९०,७९०/- (अक्षरी- एक लक्ष नव्वद हजार सातशे नव्वद मात्र )ही मा. लवाद श्री. अभिजित कुलकर्णी यांस नियमानुसार टप्पेनिहाय फी रक्कम अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.सदरचा खर्च "दावे व खटले फी" या लेखाशिर्षकातुन करण्यात यावा.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** ३३५ **विभाग :-** स्मशानभूमी
**दिनांक :-** २८/०५/२०२१

---

**विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमीत प्रेत दहनासाठी जळाऊ लाकडांचा पुरवठा करणेकरिता सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरीमिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत एकूण ८५ स्मशानभूमी आहेत. सदर स्मशानभूमीत प्रेत दहनाकरिता जळाऊ लाकडे महानगरपालिकेमार्फत मोफत पुरविण्यात येत आहेत.

सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात मे. श्री. शंकर टिंबर ट्रेडींग, विरार (पुर्व) यांचेमार्फत ई-निविदेद्वारे ३४०० टन जळाऊ लाकडे ई-निविदेतील मंजूर दरानुसार खरेदी करणेत आलेली आहेत. मंजूर ई-निविदा ही रुपये एक कोटी रक्कमेची होती. याद्वारे खरेदी होणारी जळाऊ लाकडे माहे मे २०२१ अखेरपर्यंत पुरवठा होणे अपेक्षित आहे. माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२१ अखेरपर्यंत एकूण ९२९१ प्रेत दहन करण्यात आली आहेत. याकरिता अंदाजित ४०३५ टन जळाऊ लाकडांचा वापर झालेला आहे.

सन २०१७-१८ पासून पुढीलप्रमाणे जळाऊ लाकडे खरेदी करणेकरिता महानगरपालिकेकडून खर्च करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| सन २०१७-१८ | रु. १,८२,८५,२४२/- |
| सन २०१८-१९ | रु. १,५८,७२,५७२/- |
| सन २०१९-२० | रु. १,९५,४४,१२७/- |
| सन २०२०-२१ | रु. १,७६,०७,६०९/- |

सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमीत प्रेत दहनाकरिता अंदाजित ४४०० टन जळाऊ लाकडे खरेदी करणे अपेक्षित आहे. महानगरपालिका खरेदी करत असलेला प्रती टनाचा दर रु. ४५००/- अशी एकुण अंदाजित रक्कम रु. २ कोटी इतके जळाऊ लाकूड खरेदीकरिता होणारा खर्च सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातील "प्रेत दहन लाकडे खरेदीसह विद्युतदाहिनी वापर अनुदान " या लेखा शिर्षाखाली तरतुदीमधुन मागविणे शक्य आहे. सदर लाकडांची ई-निविदेद्वारे खरेदी करणेकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

ठराव निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमीत प्रेत दहनासाठी जळाऊ लाकडाचा पुरवठा करणेकरिता मनपा अधिनियम १९४९ क्र. ६७(३)(क) अन्वये प्राप्त अधिकारा नुसार जळाऊ लाकूड खरेदीकरिता होणारा खर्च सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातील अंदाजित रक्कम रु. २ कोटी इतके जळाऊ लाकूड खरेदीकरिता होणारा खर्च "प्रेत दहन लाकडे खरेदीसह विद्युतदाहिनी वापर अनुदान " या लेखा शिर्षाखाली तरतुदीमधुन सदर लाकडांची ई-निविदेद्वारे खरेदी करणेकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

२१/५/२०२१

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** २३६

**विभाग : वैद्यकीय आरोग्य**
**दिनांक :** ३१/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कार्यरत कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड-१९ रुग्णालये याकरीता आवश्यक असलेले विविध विषयांचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी, एम.बी.बी.एस., जी.एन.एम., फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक व क्ष-किरण सहाय्यक या वर्गाची सेवा थेट मुलाखती घेऊन तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ६ महिन्याच्या कालावधीसाठी किंवा कोरोना प्रादुर्भाव संपेपर्यत, जे आधी घडेल तोपर्यंत दरमहा मानधनावर नियुक्त करणेस व याकामी वेतनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

**संदर्भ :-** १) कोव्हीड-१९ च्या उपचारासाठी कर्मचारी व साहित्य उपलब्ध करण्याबाबत क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.७६/आरोग्य ५, सार्वजनिक आरोग्य विभाग दि.२७ मार्च, २०२०

२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.92/DisM- 1, दि.१२ मे, २०२१

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई व विजयनगर-तुळींज रुग्णालय, नालासोपारा अशी २ रुग्णालये व १ सुपरस्पेशालिटी पॉली क्लिनिक कार्यरत आहेत. तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे, क्षयरोग विभाग व ३ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयाचे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे, माताबाल संगोपन केंद्रे, दवाखाने, क्षयरोग विभाग व वैद्यकीय आरोग्य विभागासाठी महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) यानुसार मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारात तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग दरमहा मानधनावर नियुक्ती करणेकामी आवश्यक असलेले वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग महानगरपालिकेच्या २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ दवाखाने, आय.सी.यू.विभाग, डायलेसीस विभाग, ३ माताबाल संगोपन केंद्रे व वैद्यकीय आरोग्य विभाग येथे कामकाज करणेसाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने मा. सर्वसाधारण सभेच्या व मा. प्रशासकीय ठराव मंजूरीने थेट मुलाखती घेऊन नियुक्त करण्यात आलेले आहे.

तथापि राज्यात कोरोना विषाणूचा संसर्ग मोठया प्रमाणात झालेला असून त्याचा प्रादुर्भाव आपल्या महानगरपालिका कार्यक्षेत्रात ही संसर्ग वाढत असल्याचे दिसून येत आहे. कोरोना विषाणू संदर्भात राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ अंतर्गत राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनेच्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरिकांमध्ये संसर्ग वाढू नये यासाठी त्यावर वेळीच उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यांत येत आहेत. याकामी महानगरपालिकेने विविध ठिकाणी कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड-१९ रुग्णालये सुरु केलेले आहेत. सदर ठिकाणी उपरोक्त पदांच्या कोव्हीड-१९ च्या कामकाजाकरीता करार पध्दतीने टप्प्याटप्प्याने आवश्यकतेनुसार थेट मुलाखती घेऊन नियुक्त करण्यांत आलेले होते त्यापैकी काही कालावधीनंतर सदरचे पदांवरील वैद्यकीय

अधिकारी/कर्मचारी सोडून गेल्याने/राजीनामा दिल्याने अपुऱ्या मनुष्यबळामुळे रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या दैनंदिन वैद्यकीय सेवेवर यांचा परिणाम होत आहे. महानगरपालिका क्षेत्रात कोरोना बाधित रुग्णांची संख्या फार मोठया प्रमाणावर वाढत आहे. सदयस्थित कोव्हीड-१९ विषाणू प्रादुर्भावची दुसरी लाट सुरु आहे. कोव्हीड-१९ विषाणूत होणाऱ्या जनुकीय बदल आणि उत्परिवर्तनामुळे संभाव्य तिसऱ्या लाटेची शक्यता असल्याने व महानगरपालिका क्षेत्रात म्युकरमायकोसिस या आजाराचे रुग्ण आढळून आल्याने पुढील धोका लक्षात घेऊन या आजारावर उपचारासाठी पूर्वतयारी करणे आवश्यक असल्याने सदरची पार्श्वभूमी लक्षात घेता नव्याने सुरु होणाऱ्या कोव्हीड-१९ रुग्णालयांसाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे. तसेच भविष्यातील परिस्थिती लक्षात घेऊन मा.आयुक्त महोदयांशी झालेल्या चर्चेनुसार कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड-१९ रुग्णालये येथील कोव्हीड-१९ बाधित रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविणेकामी विविध विषयांचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस., जी.एन.एम., फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक व क्ष-किरण सहाय्यक या वर्गाची आवश्यकता असल्याने सदरच्या पदांची थेट मुलाखती घेऊन कंत्राटी पध्दतीने दरमहा एकत्रित ठोक मानधनावर नियुक्त करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पद | आवश्यक पदे | दरमहा मानधन रु. | सहामाही खर्च रु. |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी स्त्रीरोग तज्ञ | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- | रु.१,०२,००,०००/- |
| २. | वैद्यकीय अधिकारी भिषक (फिजिशियन) | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- | रु.१,०२,००,०००/- |
| ३. | वैद्यकीय अधिकारी भूलतज्ञ | २० किंवा (आवश्यकतेनुसार | रु.८५,०००/- | रु.१,०२,००,०००/- |
| ४. | वैद्यकीय अधिकारी बालरोग तज्ञ | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- | रु.१,०२,००,०००/- |
| ५. | वैद्यकीय अधिकारी कान,नाक,घसा तज्ञ | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- | रु.१,०२,००,०००/- |
| ६. | वैद्यकीय अधिकारी नेत्र शल्यचिकित्सक | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.८५,०००/- | रु.१,०२,००,०००/- |
| ७. | वैद्यकीय अधिकारी दंत शल्यचिकित्सक | २० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.५५,०००/- | रु.६६,००,०००/- |
| ८. | वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. | ५० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.७५,०००/- | रु.२,२५,००,०००/- |
| ९. | जी.एन.एम. (अधिपरिचारिका) | १०० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.३४,८००/- | रु.२,०८,८०,०००/- |
| १०. | फार्मासिस्ट | ५० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.२०,८००/- | रु.६२,४०,०००/- |
| ११. | प्रयोगशाळा सहाय्यक | ५० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.१८,७००/- | रु.५६,१०,०००/- |
| १२. | क्ष-किरण सहाय्यक | ५० किंवा (आवश्यकतेनुसार) | रु.१८,७००/- | रु.५६,१०,०००/- |
| | एकूण | | | रु.१२,८६,४०,०००/- |

१) सबब यानुसार वरील तक्त्यात नमूद पदांची आवश्यकता लक्षात घेता सदरची पदे ही थेट मुलाखती घेऊन कंत्राटी पध्दतीने ६ महिन्याच्या कालावधीसाठी किंवा कोरोना प्रादुर्भाव संपेपर्यत, जे आधी घडेल तोपर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) नुसार मा.आयुक्त यांचे अधिकारात कंत्राटी पध्दतीने अस्थायी स्वरुपात नियुक्त करणे आवश्यक आहे. याकामी वेतनापोटी

सहामाही अंदाजे खर्च रु.१२,८६,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित असुन सदरचा खर्च सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात "वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय सेवा व्यवस्थापन ठेका" या लेखाशिर्षाखाली रु.३१,२१,५०,०००/- या तरतुदी मधून भागविता येईल.

२) तसेच महानगरपालिकेचे कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, कोव्हीड लसीकरण केंद्र, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड-१९ रुग्णालये येथील कामकाजासाठी एम.बी.बी.एस बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस., जी.एन.एम. व ए.एन.एम यांचे विनंती अर्ज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात प्राप्त झाले होते. त्यानुसार एम.बी.बी.एस.-०१, बी.ए.एम.एस.-०६, बी.एच.एम.एस.-०१, जी.एन.एम.-०४ व ए.एन.एम.-०९ दि.०७/०४/२०२१ ते दि.२०/०५/२०२१ या कालावधीत ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने कोव्हीड-१९ च्या कामकाजासाठी कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, कोव्हीड लसीकरण केंद्र, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड-१९ रुग्णालये येथे हजर झालेले आहेत. सदर कार्यरत पदांना कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्येतचा ठराव घेण्यात आलेला नाही. याकामी कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक आहे.

३) तरी यानुसार विविध विषयांचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी, एम.बी.बी.एस., जी.एन.एम., फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक व क्ष-किरण सहाय्यक ही पदे नियुक्ती करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) नुसार मा.आयुक्त यांचे अधिकारात महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिर सुचना प्रसिध्द करुन थेट मुलाखती द्वारे उपरोक्त नमुद पदे कंत्राटी पध्दतीने अस्थायी स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी किंवा कोरोना प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तोपर्यंत दरमहा मानधनावर आवश्यकतेनुसार नियुक्त करणे योग्य होईल.

यानुसार वरील अ.क्र.१ ते ३ च्या बाबींसाठी मान्यतेची आवश्यकता असल्याने सदरच्या बाबी प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा व कोव्हीड-१९ चे अत्यावश्यक कामकाज लक्षात घेऊन महानगरपालिकेचे कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, कोव्हीड लसीकरण केंद्र, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड-१९ रुग्णालये येथील कामकाजासाठी ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने दि.०७/०४/२०२१ ते दि.२०/०५/२०२१ या कालावधीत हजर झालेले एम.बी.बी.एस.-०१, बी.ए.एम.एस.-०६, बी.एच.एम.एस.-०१, जी.एन.एम.-०४ व ए.एन.एम.-०९ या कार्यरत पदांना वेतनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच कोव्हीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड-१९ रुग्णालये याकरीता आवश्यक विविध विषयांचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी- रु.८५,०००/-, दंत शल्यचिकित्सक-रु.५५,०००/-, एम.बी.बी.एस.- रु.७५,०००/-, जी.एन.एम.- रु.३४,८००/-, फार्मासिस्ट- रु.२०,८००/-, प्रयोगशाळा सहाय्यक- रु.१८,७००/- व क्ष-किरण सहाय्यक- रु.१८,७००/- ही पदे दरमहा मानधनावर कंत्राटी पध्दतीने ६ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यंत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यंत सेवा घेणेकामी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिर सुचना प्रसिध्द करुन थेट मुलाखती द्वारे आवश्यकतेनुसार पद भरती प्रक्रिया करणेस, नियुक्ती आदेश देणेस व वेतनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

3/5/21

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (डी), आचोळे, नालासोपारा (पू)**
**ता.वसई, जि.पालघर**

**ठराव क्र.** ९३८ **दिनांक** ३१/०५/२०२१

---

**विषय-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी), नालासोपारा (पू) हद्दीतील नागेला तलाव सन २०२१-२०२४ या तीन वर्षाकरीता मत्स्यसंवर्धनासाठी मागविणेत आलेल्या निविदा दरास मंजुरी देणे.

**प्रस्ताव-** वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती (डी), आचोळे, नालासोपारा (पूर्व) अंतर्गत नागेला तलाव मत्स्यसंवर्धनासाठी सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षाकरीता देणेकामी प्रशासकीय ठराव क्र. ५०७, दि. २२/०२/२०२१ रोजी घेण्यातआलेली आहे.

| अ.क्र | निविदा धारकाचे नाव | दर |
|---|---|---|
| १ | श्री.फहाद फरीद मुल्ला | २,३२,०००/- |
| २ | श्री.मोजम अखलाल डबरे | २,१२,०००/- |
| ३ | श्री.वसिम अखलाल डबरे | २,१०,०००/- |
| ४ | श्री.अभय बबन पाटणकर | २,०८,०००/- |

उपरोक्त निविदा धारकांपैकी श्री फहाद फरीद मुल्ला यांचे कडील सर्वात जास्त दराची निविदा (रक्कम रु.२,३२,०००/- प्राप्त झाली असून सर्वात जास्त दराची निविदा मंजुर करणेस हरकत नाही.

**निर्णय -** नागेला तलाव ३ वर्षासाठी मत्स्यसंवर्धनासाठी देणे कामी मागविणेत आलेल्या उपरोक्त ४ निविदा धारकांपैकी सर्वात जास्त दराची निविदा श्री.फहाद फरीद मुल्ला यांची निविदा आहे.. कलम ६७ (३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मंजुरी देण्यात येत आहे.

मंजुर निविदा रक्कम रुपये २,३२,०००/- व त्यावर १८% GST व २% IT या प्रमाणे येणारी रक्कम रु. २,७८,४००/- ठेकेदाराकडून वसुल करुन करारनामा करुन घेण्यात यावा. यासाठी होणारे इतर अनुशांगिक खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

Lihn 31/5

**आयुक्त तथा प्रशासक**
वसई-विरार शहर महानगरपालिका

E:\shweta\Talav Lilav\New Talalv Lilav\NagelaTalav 25-11-20.docx17

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्रं. ६२८ | विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-३१/०५/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका मालकीच्या इमारतींमध्ये स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा बसविणे कामी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या नव्याने बांधकाम केलेल्या १) बोळींज येथील मासळी मार्केट इमारत व २) नालासोपारा (प.) येथील मासळी मार्केट इमारतींचे बांधकाम पुर्ण झाले असून सदर इमारतीमध्ये कोव्हीड-१९ रुग्णांकरीता रुग्णालय सुरु होणार आहे. रुग्णालयाचे काम अंतिम टप्प्यात असून येत्या काही दिवसात काम पुर्ण होणार आहे. त्यानंतर रुग्णालय कोव्हीड-१९ रुग्णांकरीता कार्यरत असणार आहे. इमारतीचा वापर रुग्णालयाकरीता होणार असल्याने अचानक आगीची दुर्घटना घडल्यास तातडीने आग विझवता यावी याकरीता इमारतीमध्ये स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा तातडीने बसविणे आवश्यक आहे. याबाबत मा. उप-आयुक्त (भांडार) यांनी संदर्भ क्रं. २ वर नमूद आदेशान्वये निर्देशीत केलेले आहे.

सदर दोन्हीं इमारतीं मध्ये राष्ट्रीय इमारत संहिता (National Building Code) तसेच महाराष्ट्र आग प्रतिबधंक व जीवसरंक्षक उपाय योजना अधिनियम २००६ अन्वये स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा तातडीने बसविणे अत्यावश्यक आहे.

सद्या लॉकडाऊन असल्यामुळे व कोव्हीड १९ रुग्णांमध्ये वाढ होत असल्याने रुग्णालये तातडीने सुरु करावयाची असून इमारतीमध्ये स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा बसविणे कामी ई-निविदा प्रक्रिया करणे करीता बराच कालावधी जाणार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क अन्वये आपत्कालीन परिस्थितीत मा. आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९ पोटकलम ५ (२)(२) अन्वये अग्निशमन संचालक यांनी प्राधिकृत केलेल्या अभिकरणामार्फत विना निविदा तात्काळ सदर इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविता येईल.

तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण-२०२०/प्र.क्रं.५९/२०/कोषा प्रशा-५ दिनांक १८/०३/२०२० अन्वये कोरोना आजाराचा प्रादुर्भाव विचारात घेता, त्याचा मुकाबला करण्याकरीता आवश्यक असणा-या औषधे, उपकरणे, यंत्रसामुग्री तसेच तत्सम साहित्य व सेवा यावरील खर्चास आर्थिक निर्बधांतून सूट देण्यात आलेली आहे. त्याबाबतचे परिपत्रक सोबत जोडले आहे.

सदर दोन्हीं इमारतींमध्ये स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा बसविणे करीता मा. प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी तपासणी करुन अहवाल सादर केलेला आहे.

वरील दोन्ही प्रस्तावीत रुग्णालयाचे स्थायी अग्निशमन यंत्रणेसाठी प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार रक्कम रु. ५१,९०,२६४/- + रु. ९,३४,२४७/- वस्तू व सेवा कर असे एकुण रक्कम रु. ६१,२४,५११/- अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

सदर कामाकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच प्रत्यक्ष कामास सुरुवात करुन काम पुर्णत्वास नेणे करिता अधिक वेळ खर्च होण्याची शक्यता असल्याने आणिबाणी प्रसंगी तातडीची बाब म्हणून कालापव्यय वाचविणे करिता मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी प्राधिकृत केलेल्या अभिकरणापैकी १)"द फायर प्रोटेक्शन कंपनी" २) मे. रोनक फायर इंडस्ट्रीज ३) मे. फायरबर्ड फायर सर्व्हिसेस या एजन्सी स्थानिक आहेत. सदर एजन्सीज मार्फत महापालिका क्षेत्रातील अनेक विविध स्वरुपाच्या इमारतींना स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा बसविण्याची कामे केली असून त्यांना सदर कामाचा अनुभव आहे. सदर एजन्सींच्या कामाचा अनुभव पाहता उपरोक्त इमारतींना अग्निशमन यंत्रणा बसविणे करीता प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी न्यूनतम दर असलेल्या एजन्सीजकडून सदर काम करुन घेणे उचित ठरेल. तीन ही एजन्सीजकडून प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्रं. | कामाचा तपशिल | दि फायर प्रोटेक्शन कंपनी | मे. रोनक फायर इंडस्ट्रीज | मे. फायरबर्ड फायर सर्व्हिसेस |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिकेच्या मालकीच्या नव्याने बांधकाम केलेल्या बोळींज येथील इमारतीमध्ये स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा बसविणे व कार्यान्वित करुन देणे | २१९९३००/-<br>+ १८% GST ३९५८७४/-<br>एकुण - २५९५१७४/- | २००००००/-<br>+ १८% GST ३६००००/-<br>एकुण - २३६००००/- | २४१८१००/-<br>+ १८% GST ४३५२५८/-<br>एकुण - २८५३३५८/- |
| २ | महानगरपालिकेच्या मालकीच्या नव्याने बांधकाम केलेल्या नालासोपारा (प.) येथील इमारतीमध्ये स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा बसविणे व कार्यान्वित करुन देणे | ३२०३८५०/-<br>+ १८% GST ५७६६९३/-<br>एकुण - ३७८०५४३/- | २७८०८००/-<br>+ १८% GST ५००५४४/-<br>एकुण - ३२८१३४४/- | ३२९२५००/-<br>+ १८% GST ५९२६५०/-<br>एकुण - ३८८५१५०/- |
| | एकुण | रु. ६३,७५,७१७/- | रु. ५६,४१,३४४/- | रु. ६७,३८,५०८/- |

उपरोक्त नमूद तुलनात्मक तक्त्यानुसार सदर इमारतींमध्ये स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा बसविणे कामी "मे. रोनक फायर इंडस्ट्रीज" या कंपनीकडून सादर केलेल्या न्युनतम दरपत्रकानुसार अंदाजित खर्च रक्कम रु. ५६,४१,३४४/- दिलेला आहे. वरील न्यूनतम दरांची पडताळणी केली असता त्यामध्ये प्राप्त झालेले दर बाजारभावाप्रमाणे आहेत. प्रत्यक्ष आवश्यक लागणा-या बाबींचा एकत्रीत खर्च सुमारे रु. ५६,४१,३४४/- पर्यंत येत असल्याने प्राप्त झालेले दर योग्य व वाजवी आहेत. तरी प्राप्त झालेले न्युनतम दर योग्य असल्याने मंजुरीस्तव सादर.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३१ वर १४ नंबरचे लेखाशिर्ष फायर ऑडिट व उपाय योजना यामध्ये एकुण वार्षिक रक्कम रुपये १ कोटी रुपये तरतुद असून सदर खर्च या तरतुदी मधून करता येईल.

सदर इमारतींमध्ये अग्निरोधक यंत्रणा तात्काळ बसविणे आवश्यक असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी प्राधिकृत केलेली एजन्सी "मे. रोनक फायर इंडस्ट्रीज" या कंपनीकडून स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा तात्काळ बसविणे कामी येणा-या अंदाजीत रक्कम रु. ५६,४१,३४४/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या नव्याने बांधकाम केलेल्या बोळींज व नालासोपारा (प.) येथील इमारती कोव्हीड-१९ रुग्णालयाकरीता वापरात येणार असल्याने मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी प्राधिकृत केलेली एजन्सी "मे. रोनक फायर इंडस्ट्रीज" या एजन्सीकडून विना निविदा थेट स्थायी स्वरुपाची अग्निशमन यंत्रणा तात्काळ बसविणे व कार्यान्वित करुन देणे कामी कार्यादेश देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अनुसुची 'ड' प्रकरण ५ (२) (२) व कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार येणा-या अंदाजीत रक्कम रु. ५६,४१,३४४/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

T|13

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी – २०२०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १३८ — विभाग : आस्थापना

दिनांक : ३१ /०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** विजयवल्लभ हॉस्पिटल, विरार प., ता. वसई, जि. पालघर येथे दि.२३/०४/२०२१ रोजी लागलेल्या आगीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या व जखमी रुग्णांना आर्थिक मदत देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर:-** विजयवल्लभ हॉस्पिटल, तिरुपती फेज-१, विरार (प.) या तळमजला + ४ मजली खाजगी रुग्णालयात कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार केले जात आहेत. सदर विजयवल्लभ हॉस्पिटल ही इमारत तळमजला + ४ मजली असून तळ मजल्यावर रिसेप्शन, वेटींग हॉल आहे. पहिल्या मजल्यावर जनरल वॉर्ड आहे, दुसऱ्या मजल्यावर अतिदक्षता विभाग आहे, तिसरा व चौथा मजल्यावर स्पेशल वॉर्ड अशी रचना आहे. सदर रुग्णालयात सुमारे ८५ कोरोनाबाधित रुग्ण उपचार घेत होते. दिनांक २३ एप्रिल, २०२१ रोजी पहाटे ०३:१३ मिनिटांनी रुग्णालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर असलेल्या आयसीयु युनिटमध्ये आग लागल्याने सदर आयसीयु युनिटमधील यंत्रणा ठप्प होऊन सर्वत्र धूर व अंधारही पसरला असल्याची माहिती महानगरपालिका अग्निशमन विभागास मिळताच पहाटे ०३:१८ वाजता महानगरपालिका अग्निशमन विभाग यंत्रणेने तात्काळ घटनास्थळी जाऊन आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु केले.

विजयवल्लभ हॉस्पिटलमधील आयसीयु युनिटमध्ये एकूण १७ रुग्ण उपचार घेत होते. तेथे व्हेंटीलेटर्स व ऑक्सिजन इ. उपचार यंत्रणा जोडलेली होती. महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या टीमने तात्काळ अतिदक्षता विभागात पोहचून पाहणी केली असता सदर ठिकाणी आगीच्या दुर्घटनेमुळे १७ रुग्णांपैकी १३ रुग्ण हे जळालेल्या अवस्थेत असल्याचे आढळून आले व त्यांचा घटनास्थळीच दुर्दैवाने मृत्यु झाला होता व इतर ४ जखमी रुग्णांना महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या टीमने तात्काळ दुसऱ्या कोव्हिड रुग्णालयांमध्ये हलविले. त्यापैकी २ रुग्णांचा मृत्यु उपचारांदरम्यान झाला आहे. सदर घटनेमध्ये मृत झालेल्या रुग्णांमध्ये ५ महिला व १० पुरुष यांचा समावेश असून त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मयत रुग्णांचे नाव | वय/लिंग | पत्ता | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | उमा सुरेश कनगुटकर | ६३ वर्षे महिला | ४८ ए, एमबी, कवळी वाडी, गोखले रोड, जखादेवी मंदिर, दादर, पश्चिम | ९०११२१६६६३ |
| २ | निलेश भोईर | ३५ वर्षे पुरुष | रा-पॉली आळी, ता. पालघर, राजेश किणी | ९८९०८३४०२५ |
| ३ | पुखराज वल्लभदास वैष्णव | ६८ वर्षे पुरुष | श्रीपाल विहार, ए-विंग, सुमन कॉम्प्लेक्स, देसाई हॉस्पिटल जवळ, विरार (प.) | ९२२६२३७३१६ |
| ४ | रजनी आर. कुडू | ६० वर्षे महिला | रा/पोस्ट-खानिवडे, वसई, पालघर | ९८६०२५८६९१ |
| ५ | नरेंद्र शंकर शिंदे | ५८ वर्षे पुरुष | रिजन्सी सर्म बिल्डींग नं.९, रु.नं.७०६, टिटवाळा पूर्व | ९८८११५७३७२ |
| ६ | जनार्दन मोरेश्वर म्हात्रे | ६३ वर्षे पुरुष | २२४, मोरेश्वरलय, नाळा रोड, नाळा स्टॉप, मच्छि मार्केट समोर, ता. वसई, जि. पालघर, पो. सोपारा | ८९२८८०३३२५ |
| ७ | कुमार किशोर दोशी | ४५ वर्षे पुरुष | ए-२०१, रिशीकेश माथुर को.हौ.सो लि., १०० फीट रोड, न्यु एसटी फ्रान्सिस शाळा, वसई प. | ९८२००२२१९७ |
| ८ | रमेश टी. उपयान | ५५ वर्षे पुरुष | विनय युनिक रेसिडन्सी, बिल्डींग नं.०३, फ्लॅट नं.५०१, विंग-बी, पाचवा मजला, मुल्जीभाई मेहता शाळेसमोर, विरार प. | ९९६०३८२२३६ |
| ९ | प्रवीण शिवलाल गोडा | ६५ वर्षे पुरुष | ४- पहिला मजला, मंगल दीप बिल्डींग, व्ही.एस. मार्ग, साईबाबा मंदीर, विरार (पू.) | ७८७५६९३५१७ |
| १० | अमेय राजेश राऊत | २३ वर्षे पुरुष | बी १०१/ हरी गंगा अपार्ट., फुलपाडा रोड, विरार (पू.) | ९९७५५२४७९७ |
| ११ | शमा अरुण म्हात्रे | ४८ वर्षे महिला | उत्तन कारवाडी, राममंदिर जवळ, कळंब, नालासोपारा प. | ८०८७३९९१८० |
| १२ | सुवर्णा एस. पितळे | ६४ वर्षे महिला | चाळपेठ, आगाशी, जुने जैन मंदीर, विरार प. | ९१७२४३९६३५ |
| १३ | सुप्रिया देशमुख | ४३ वर्षे महिला | बी ९०२, सुगंधी हाईट्स, खारोडी नाका, बोळींज, विरार प. | ७०२८३७२८७६ |
| १४ | निरव देवेंद्र संपत | ३१ वर्षे पुरुष | १०२, आकाश दीप, जैन मंदिर रोड, विरार प. | ९०२२५५८६५० |
| १५ | शिवाजी पांडुरंग विलकर | ५६ वर्षे पुरुष | ए-१०२, जास अपार्ट., विराटनगर, विरार (प.) | ७४९८५४९२१५ |

वरील नमूद मृत रुग्णांव्यतिरिक्त अतिदक्षता विभागातील इतर २ जखमी रुग्णांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | रुग्णांचे नाव | वय/लिंग | पत्ता | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. फातिमा ज्युलियन परेरा | ७० वर्षे महिला | घर नं.२४२,बी-आगाशी, बारीवाडा | ८६९८८७६००९ |
| २ | श्री. सुभा दास | ३७ वर्षे पुरुष | बिल्डींग नं.०७, युनिटेक वेस्ट ॲण्ड चांबळ, तिरुपती नगर-२,विरार प. | ९३३१८२४९६१ |

घटनास्थळी मा. नगरविकास मंत्री नामदार श्री. एकनाथजी शिंदे, मा. पालघर जिल्हा पालकमंत्री तथा मा. कृषी मंत्री नामदार श्री दादाजी भुसे, मा. हितेंद्रजी ठाकूर, वसई विधानसभा मतदार संघ, मा. क्षितीजजी ठाकूर, नालासोपारा विधानसभा मतदार संघ व मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका उपस्थित होते आणि त्यांनी सदर दुर्दैवी घटनेतील मृत रुग्णांच्या वारसांना व जखमी रुग्णांना अनुक्रमे प्रत्येकी रक्कम रु.५ लक्ष व रक्कम रु.५० हजार देण्याचे जाहीर केले आहे.

सदरचा खर्च नैसर्गिक आपत्ती इतर या लेखाशिर्षांतर्गत असलेल्या रक्कम रु.१०.०० कोटी तरतूदीमधून करण्यात येईल. यापोटी रक्कम रु.७६.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७(३)(क) नुसार कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत, जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये दुसऱ्या एखाद्या नगरपालिका प्राधिकाऱ्याच्या किंवा [राज्य] शासनाच्या मंजुरी, मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे,अशी तरतूद आहे.

ठराव:- उक्त प्रस्तावचे अवलोकन करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे. विजयवल्लभ हॉस्पिटल, विरार प., ता. वसई, जि. पालघर येथे दि.२३/०४/२०२१ रोजी लागलेल्या आगीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांना प्रत्येकी रक्कम रु.५ लक्ष व जखमी रुग्णांना प्रत्येकी रक्कम रु.५००००/- अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

१) सदरचा खर्च नैसर्गिक आपत्ती इतर या लेखाशिर्षांतर्गत करण्यात आलेल्या १० कोटींच्या तरतूदींतून भागविण्यात यावा.
२) सदर मयत व जखमी रुग्णांच्या वारसांची खात्री करुनच सदरचे आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

31/5/2021

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र : ६४०

दिनांक: २१/०५/२०२१
विभाग:बाजार लिलाव

प्रस्तावाचा विषय :- दि. ०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ (३वर्ष) कालावधी करीता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती- जी अंतर्गत सातिवली दैनंदीन व आठवडा घाऊक बाजार फी वसुली करीता ठेका पध्दतीने देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

१. कामाचे नाव :- वालीव क्षेत्रातील सातिवली दैनंदीन घाऊक बाजार फी वसुली करीता ठेका पध्दतीने देणेबाबत.

२. प्रशासकीय मान्यता :- प्रशासकीय ठराव दि .०९/०३/२०२१, ठराव क्र.५९५

३. ई- निविदा अंदाजे रक्कम :- २,००,२३,४९८/- (३ वर्षाकरिता)

४. ई- टेंडरींग निविदा प्रसिध्दी :-
वृत्तपत्राचे नाव व दिनांक :- दै.खबरे आज तक दि.०९/०३/२०२१ ते २३/०३/२०२१
दै.पुढारी दि. ०९/०३/२०२१ ते २३/०३/२०२१
दै.नरवीर चिमाजी दि.०९/०३/२०२१ ते २३/०३/२०२१

५. विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :- ०१

६. ई- टेंडरींग निविदा प्रथम मुदतवाढ
प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक:- दै.पुढारी दि.२४/०३/२०२१ ते ३०/०३/२०२१
दै.नरवीर चिमाजी दि. २४/०३/२०२१ ते ३०/०३/२०२१

७. विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :- ०१

८. ई- टेंडरींग निविदा प्रथम मुदतवाढ
प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक:- दै.बहुजनरत्न लोकनायक दि.०१/०४/२०२१ ते ०७/०४/२०२१
दै.नवराष्ट्र दि.०१/०४/२०२१ ते ०७/०४/२०२१

९. विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :- ०३

१०. निविदा स्वीकारण्याची दिनांक :- ०७/०४/२०२१

११. निविदा उघडण्याची दिनांक :- ०८/०४/२०२१

१२. प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- मा.उप. आयुक्त सो. (दै. बाजार फी )

१०. निविदा स्वीकारण्याची दिनांक :- ०७/०४/२०२१

११. निविदा उघडण्याची दिनांक :- ०८/०४/२०२१

१२. प्राप्त निविदा उघडणारे
अधिकारी :- मा.उप. आयुक्त सो. (दै. बाजार फी )

१३. विहित मुदतीत लखोटा क्र.१ उघडण्याची दिनांक ०८/०३/२०२१ होती. ई निविदा उघडण्याचा कक्ष मुख्यालयात आहे.मा.आयुक्त यांच्या मान्यतेने लखोटा क्र.२ दिनांक ३१/०५/२०२१ रोजी उघडण्यात आला. लखोटा क्र.२ मध्ये मागणी प्रमाणे उपलब्ध निविद रक्कम खालील प्रमाणे.

| अनुक्रमांक | ठेकेदाराचे नाव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| १ | रामकैलास यादव | रक्कम रु.२,०१,००,००६/- |
| २ | आर.एस. एन्टरप्राईजेस | रक्कम रु.२,००,७०,०००/- |

मा.स्थायी समिती ठराव क्र.२ दिनांक ०२/०५/२०२० अन्वये बाजार कर फी वसुली करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार राहील.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंतच्या ३ वर्षाकरिता सर्वात जास्त निविदा रक्कम रु.२,०१,००,००६/- अनुक्रमांक ०१ चे निविदाकार रामकैलास यादव यांचे निविदातील दर हे इतर निविदाधारका पेक्षा जास्त असुन योग्य व वाजवी असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार ०१ रामकैलास यादव यांची जास्त दराची संविदा करणेस निविदा समिती मान्यता देत आहे. त्यांच्या समवेत करारनामा व कार्यादेश करणेस खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावात नमुद प्राप्त निविदापैकी अनुक्रमांक ०१ मधील निविदाधारक श्री. रामकैलास यादव यांच्या निविदातील रु.२,०१,००,००६/-हा दर इतर निविदा धारकांपेक्षा जास्त असुन वाजवी असल्याने दिनांक ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२४ या तीन वर्षांकरिता रक्कम रु.२,०१,००,००६/- ही रक्कम मंजुर करुन त्यावर २% आयकर स्विकारुन श्री. राम कैलास यादव यांचे बरोबर संविदा करुन त्यांच्या समवेत करारनामा व कार्यादेश करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

**वसई — विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५**
**दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७**
**ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com**

---

**प्रशासकीय ठराव क्र. :-** १४१

**विभाग :- वाहन**
**दिनांक :-** ३१/०५/२०२१

**विषय :- सन २०२० -२१,२०२१-२२ व २०२२-२३ ह्या तीन वित्तिय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडेतत्वावर वाहने पुरवठा करणे.**

**प्रस्तावाचा मजकूर** :- सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ ह्या तीन वित्तिय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडेतत्वावर वाहने पुरवठा करणेकामी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३ दिनांक २०/०२/२०२० अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. प्राप्त मंजूरीन्वये दि. ०९/११/२०२० रोजीच्या दै. सकाळ, दै. नवराष्ट्र, दै. नवभारत, दै. मिड-डे, दै. पूर्णविराम, दै. जागरुक टाईम्स व दै. इंडीयन एक्सप्रेस या वृत्तपत्रांमध्ये जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन इच्छूक निविदाकारांकडून ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. दिलेल्या मुदतीत एकूण ०५ ई- निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तांत्रिक बाबींचा लिफाफा क्र. १ दि. ०७/१२/२०२० रोजी उघडण्यात आला. लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पडताळणी करणेकामी मा.निविदा समिती समोर ठेवणेत आली. प्राप्त ई-निविदांमधील ०४ ई-निविदाकारांची कागदपत्र योग्य असल्याने ०४ ई-निविदा पात्र ठरवून त्यांचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडणेस मा.निविदा समितीने दि.२२/०१/२०२१ रोजी मंजूरी दिली. प्राप्त मंजूरीन्वये दि. ०२/०२/२०२१ ई-निविदेचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला. त्यातील दराचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ क्र | वाहनाचा तपशील | दराचा तपशील | निविदाकाराचे नांव व दर (सर्व करांसहीत) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. शिरीष कॉर्गो सर्व्हिस प्रा.लि. | मे. सिताराम ट्रॅव्हॅल्स | मे. पार्थ टूर्स | मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स |
| १ | बोलेरो जीप (वातानुकूलित ) | प्रती माह, २००० कि.मी | ७०८००/- | ७२५००/- | ४४९९९/- | ५७०००/- |
| २ | बोलेरो जीप (अवातानुकूलित ) | | ६८४४०/- | ७०३५०/- | ४९५५८/- | ५९८५०/- |
| ३ | टाटा सुमो (वातानुकूलित ) | | ६४९००/- | ७०३५०/- | ४४८३९/- | ५९८५०/- |
| ४ | टाटा सुमो (अवातानुकूलित ) | | ६२५४०/- | ६८२५०/- | ४२२२७/- | ५८९०५/- |
| ५ | स्विफ्ट डिझायर (वातानुकूलित ) | | ५९०००/- | ६१९५०/- | ५१६६७/- | ४८८२५/- |
| ६ | स्विफ्ट डिझायर (अवातानुकूलित ) | | ५६६४०/- | ५९८५०/- | ४७७८९/- | ४५१५०/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | इन्होवा (वातानुकूलित) | १०० कि.मी, २४ तास | ५९००/- | ६३००/- | ३०६७/- | २२०५/- |
| ८ | इन्होवा (अवातानुकूलित) | | ५३१०/- | ६०९०/- | २७१३/- | २१००/- |
| ९ | अर्टीगा (वातानुकूलित) | | ४७२०/- | ३७८०/- | २३५९/- | १८९०/- |
| १० | अर्टीगा (अवातानुकूलित) | | ४१३०/- | ३५७०/- | २१२३/- | १७८५/- |
| ११ | युटिलिटी पिकअप | प्रती माह, २००० कि.मी | ५३१००/- | ६४०५०/- | ७०२१०/- | ६५८४४/- |
| १२ | टाटा एसई टेम्पो | | ४७२००/- | ५६७००/- | ६०७७०/- | ५३९२६/- |
| १३ | टोईंग व्हॅन २०७ (दुचाकी / चारचाकी) | प्रती दिन, १२ तास | ४१३०/- | ६८२५/- | २८९२/- | ३०६८/- |
| १४ | टोईंग व्हॅन ४०७ (दुचाकी / चारचाकी) | | ४७२०/- | ७८७५/- | ३७१८/- | ३३०४/- |
| १५ | टोईंग व्हॅन ७०९ (दुचाकी / चारचाकी) | | ४७२०/- | ८९२५/- | ३८९३/- | ३१८६/- |
| १६ | टोईंग व्हॅन ९०९ (दुचाकी / चारचाकी) | | ४७२०/- | ९९७५/- | ४५४४/- | ४१३०/- |
| १७ | टोईंग व्हॅन ११०९ (दुचाकी / चारचाकी) | | ४७२०/- | १२६००/- | ५१३४/- | ५६०५/- |
| १८ | टाटा टेम्पो ४०७ | | २९५०/- | ५७७५/- | ३५३९/- | ३३०४/- |
| १९ | टाटा टेम्पो ७०९ | | २९५०/- | ६८२५/- | ४४६७/- | ३१८६/- |
| २० | टाटा / आयशर टेम्पो १०५० | | ३५४०/- | ७८७५/- | ४८३७/- | ५६६४/- |
| २१ | टाटा / आयशर टेम्पो १०९० | | ३५४०/- | ८९२५/- | ५१९१/- | ६४९०/- |
| २२ | टाटा / आयशर टेम्पो १११० | | ४१३०/- | ९९७५/- | ५७७८/- | ६७२६/- |

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेल्या दरामध्ये मे. शिरीष कॉर्गो सर्व्हिस प्रा.लि., मे. पार्थ टूर्स व मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांचे दर बाबनिहाय कमी आहेत. करिता मा.अति.आयुक्त महोदय यांचे सुचनेनुसार दि.    /    /२०२० रोजी प्राप्त कमी दराचे ई-निविदाकार मे. शिरीष कॉर्गो सर्व्हिस प्रा.लि., मे. पार्थ टूर्स व मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांना वाटाघाटी करणेकामी मा.अति.आयुक्त महोदय

यांचे दालनात बोलविण्यात आलेले होते. वाटाघाटीअंती मे. शिरीष कॉर्गो सर्व्हिस प्रा.लि., मे. पार्थ टूर्स व मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी खालीलप्रमाणे दर कमी केलेले आहेत.

| अ. क्र. | वाहनाचा तपशील | दराचा तपशील | निविदाकाराचे नांव व दर (सर्व करांसहीत) | | | | वाटाघाटी अंती कमी केलेले दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. शिरीष कार्गो सर्व्हिस प्रा.लि. | मे. सिताराम ट्रॅव्हॅल्स | मे. पार्थ टूर्स | मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स | |
| १ | बोलेरो जीप (वातानुकूलित ) | प्रती माह, २००० कि.मी | ७०८००/- | ७२५००/- | ४४९९९/- | ५७०००/- | ४४९९९/- |
| २ | बोलेरो जीप (अवातानुकूलित ) | | ६८४४०/- | ७०३५०/- | ४९५५८/- | ५९८५०/- | ४४९५०/- |
| ३ | टाटा सुमो (वातानुकूलित ) | | ६४९००/- | ७०३५०/- | ४४८३९/- | ५९८५०/- | ४४८००/- |
| ४ | टाटा सुमो (अवातानुकूलित ) | | ६२५४०/- | ६८२५०/- | ४२२२७/- | ५८९०५/- | ४२२००/- |
| ५ | स्विफ्ट डिझायर (वातानुकूलित ) | | ५९०००/- | ६१९५०/- | ५१६६७/- | ४८८२५/- | ४८८००/- |
| ६ | स्विफ्ट डिझायर (अवातानुकूलित ) | | ५६६४०/- | ५९८५०/- | ४७७८९/- | ४५१५०/- | ४५१००/- |
| ७ | इन्होवा (वातानुकूलित) | १०० कि.मी, २४ तास | ५९००/- | ६३००/- | ३०६७/- | २२०५/- | २२००/- |
| ८ | इन्होवा (अवातानुकूलित) | | ५३१०/- | ६०९०/- | २७१३/- | २१००/- | २१००/- |
| ९ | अर्टीगा (वातानुकूलित) | | ४७२०/- | ३७८०/- | २३५९/- | १८९०/- | १८५०/- |
| १० | अर्टीगा (अवातानुकूलित) | | ४१३०/- | ३५७०/- | २१२३/- | १७८५/- | १७५०/- |
| ११ | युटिलिटी पिकअप | प्रती माह, २००० कि.मी | ५३१००/- | ६४०५०/- | ७०२१०/- | ६५८४४/- | ५३०००/- |
| १२ | टाटा एसई टेम्पो | | ४७२००/- | ५६७००/- | ६०७७०/- | ५३९२६/- | ४७०००/- |
| १३ | टोईंग व्हॅन २०७ (दुचाकी / चारचाकी) | प्रती दिन, १२ तास | ४१३०/- | ६८२५/- | २८९२/- | ३०६८/- | २८९०/- |
| १४ | टोईंग व्हॅन ४०७ (दुचाकी / चारचाकी) | | ४७२०/- | ७८७५/- | ३७१८/- | ३३०४/- | ३३००/- |
| १५ | टोईंग व्हॅन ७०९ (दुचाकी / चारचाकी) | | ४७२०/- | ८९२५/- | ३८९३/- | ३१८६/- | ३१८०/- |
| १६ | टोईंग व्हॅन ९०९ (दुचाकी / चारचाकी) | | ४७२०/- | ९९७५/- | ४५४४/- | ४१३०/- | ४१००/- |
| १७ | टोईंग व्हॅन ११०९ (दुचाकी / चारचाकी) | | ४७२०/- | १२६००/- | ५१३४/- | ५६०५/- | ४७००/- |
| १८ | टाटा टेम्पो ४०७ | | २९५०/- | ५७७५/- | ३५३९/- | ३३०४/- | २९००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | टाटा टेम्पो ७०९ | | २९५०/- | ६८२५/- | ४४६७/- | ३१८६/- | २९५०/- |
| २० | टाटा / आयशर टेम्पो १०५० | | ३५४०/- | ७८७५/- | ४८३७/- | ५६६४/- | ३५००/- |
| २१ | टाटा / आयशर टेम्पो १०९० | | ३५४०/- | ८९२५/- | ५१९१/- | ६४९०/- | ३५००/- |
| २२ | टाटा / आयशर टेम्पो १११० | | ४१३०/- | ९९७५/- | ५७७८/- | ६७२६/- | ४१००/- |

वरीलप्रमाणे मे. शिरीष कार्गो सर्व्हिस प्रा.लि., मे. पार्थ टूर्स व मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी वाटाघाटीअंती दर सादर केलेले आहेत. मे. शिरीष कार्गो सर्व्हिस प्रा.लि., मे. पार्थ टूर्स व मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांचे कमी दरास व त्यांचे समवेत संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सन २०२० -२१, २०२१-२२ व २०२२-२३ ह्या तीन वित्तिय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडेतत्वावर वाहने पुरवठा करणे साठी ई-निविदा मागविण्यात आलेल्या असुन ०४ ई-निविदाधारकांनी भागही घेतलेला आहे. त्यातील मे. शिरीष कार्गो सर्व्हिस प्रा.लि., मे. पार्थ टूर्स व मे. आदिनाथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरास तसेच त्यांचे समवेत संविदा करणेस मान्यता देत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र : ६४१/अ

दिनांक: ३१/०५/२०२१

विभाग:बाजार लिलाव

**प्रस्तावाचा विषय :-** दि. ०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ (३वर्ष) कालावधी करीता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती- जी अंतर्गत गोखिवरे दैनंदीन घाऊक बाजार फी वसुली करीता ठेका पध्दतीने देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-**

१. कामाचे नाव :- वालीव क्षेत्रातील गोखिवरे दैनंदीन घाऊक बाजार फी वसुली करीता ठेका पध्दतीने देणेबाबत.

२. प्रशासकीय मान्यता :- प्रशासकीय ठराव दि .०९/०३/२०२१, ठराव क्र.५९४

३. ई- निविदा अंदाजे रक्कम :- १,७३,१७,५८४/-(तीन वर्षाकरिता)

४. ई- टेंडरींग निविदा प्रसिध्दी :-
वृत्तपत्राचे नाव व दिनांक :- दै.लोकमत दि.०९/०३/२०२१
दै.आमची मुंबई दि. ०९/०३/२०२१
दै.यशोभुमी दि.०९/०३/२०२१

५. विहीत मुदतीत ऑनलाईन
प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :- ०१

६. ई- टेंडरींग निविदा प्रथम मुदतवाढ
प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक:- दै.लोकमत दि.२४/०३/२०२१ ते ३०/०३/२०२१
दै.आमची मुंबई दि. २४/०३/२०२१ ते ३०/०३/२०२१

७. विहीत मुदतीत ऑनलाईन
प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :- ०३

ई- टेंडरींग निविदा प्रथम मुदतवाढ
प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक:- दै.जागल्या दि.०१/०४/२०२१ ते ०७/०४/२०२१
दै.आपला महानगर दि. ०१/०४/२०२१ ते ०७/०४/२०२१

८. विहीत मुदतीत ऑनलाईन
प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :- ०४
निविदा स्वीकारण्याची दिनांक :- ०७/०४/२०२१
निविदा उघडण्याची दिनांक :- ०८/०४/२०२१

९. प्राप्त निविदा उघडणारे
अधिकारी :- मा.उप. आयुक्त सो. (दै. बाजार फी )

१०. विहित मुदतीत लखोटा क्र.१ उघडण्याची दिनांक ०८/०४/२०२१ होती. ई निविदा उघडण्याचा कक्ष मुख्यालयात आहे.मा.आयुक्त यांच्या मान्यतेने लखोटा क्र.२ दिनांक ३१/०४/२०२१ रोजी उघडण्यात आला. लखोटा क्र.२ मध्ये मागणी प्रमाणे उपलब्ध निविद रक्कम खालील प्रमाणे.

| अनुक्रमांक | ठेकेदाराचे नाव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| १ | बाबा कंन्स्ट्रक्शन | रक्कम रु.१,८०,००,०००/- |
| २ | आर.एस. एन्टरप्राईजेस | रक्कम रु.१,७५,००,०००/- |

मा.स्थायी समिती ठराव क्र.२ दिनांक ०२/०५/२०२० अन्वये बाजार कर फी वसुली करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार राहील.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२४ पर्यतच्या ३ वर्षाकरिता सर्वात जास्त निविदा रक्कम रु.१,८०,००,०००/- अनुक्रमांक ०१ चे निविदाकार बाबा कंन्स्ट्रक्शन यांचे निविदातील दर हे इतर दोन निविदाधारका पेक्षा जास्त असुन योग्य व वाजवी असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार ०१ बाबा कंन्स्ट्रक्शन यांची जास्त दराची संविदा करणेस निविदा समिती मान्यता देत आहे. त्यांच्या समवेत करारनामा व कार्यादेश करणेस खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावात नमुद प्राप्त निविदापैकी अनुक्रमांक ०१ मधील निविदाधारक श्री. बाबा कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदातील रु.१,८०,००,०००/-हा दर इतर निविदा धारकांपेक्षा जास्त असुन वाजवी असल्याने दिनांक ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२४ या तीन वर्षाकरिता रक्कम रु.१,८०,००,०००/- ही रक्कम मंजुर करुन त्यावर २% आयकर स्विकारुन श्री. बाबा कंन्स्ट्रक्शन यांचे बरोबर संविदा करुन त्यांच्या समवेत करारनामा व कार्यादेश करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

TL3

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६४२

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : २९/०५/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास नवजात बालकांसाठी Suspension. Bovine Lipid Extract Surfactant (Inj. Neosurf) आवश्यक औषधे विनानिविदा खरेदी करणेस व आदेश देणेकामी प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार कौलसिटी -वसई, व जुचंद्र कोवीड रुग्णालय, नायगाव (पू) येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट व म्हाडा संकुलन, बोळींज येथे समर्पित कोविड - केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये कोरोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देतात. शासनामार्फत पुढिल कालावधीत लहान मूलांची विशेष काळजी घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्याकरिता नवजात बालकांच्या उपचारासाठी औषधांची आवश्यकता आहे. सदरचे औषध मे.सिपला लि. उत्पादीत कंपनीकडे उपलब्ध असून यांचे अधिकृत विक्रेते मे.डेल्फा ड्रग्ज ॲन्ड फार्मास्युटिकल्स, दादर यांच्यामार्फत दर प्राप्त झाले असून याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | औषधाचे नाव | पॅकिंग | दर | मागणी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Suspension. Bovine Lipid Extract Surfactant (Inj. Neosurf - Cipla) | 3 ml | 4321.39 | 3 ml x 50 | 216070 |

T15

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Suspension. Bovine Lipid Extract Surfactant (Inj. Neosurf - Cipla) | 5 ml | 7201.22 | 5 ml x 50 | 360061 |
| | | | | | |
| | | | | GST 5 % | 28807 |
| | | | | Total | Rs.6,04,938/- |

सद्यस्थितीत मे.डेल्फा ड्रग्ज ॲन्ड फार्मास्युटिकल्स, दादर यांच्याकडे वरील नमुद औषधांचा साठा उपलब्ध असून कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता सदर औषधे त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात तरी सदर औषधे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५(२)(२) अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार नवजात बालकांच्या उपचाराकरिता विनानिविदा औषधे खरेदी करणेकामी मे.डेल्फा ड्रग्ज ॲन्ड फार्मास्युटिकल्स, दादर यांना पुरवठा आदेश देणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.६,०४,९३८/- (अक्षरी- सहा लाख चार हजार नऊशे अडोतीस रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) २१/६/२०२४

आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६६३

विभाग :- भांडार विभाग
दिनांक :३१/०५/२०२१

**प्रस्तावाचा विषय:-** **वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील कोविड पॉझीटीव्ह रुग्ण शोध व उपचारकरिता व फिरते लसिकरण केंद्राचे ठिकाणी सॅमसंग कंपनीचे मोबाईल खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ चे साथीचे रोगाचा प्रादृर्भाव झालेला असून प्रतिबंधात्मक उपाय योजना व उपचार योजना महानगरपालिकेकडून करण्यांत येत आहेत.

कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत कोविड पेशंट सार्वजनिक वाहतूक साधनेद्वारे प्रवास करत असल्याने शहरामध्ये कोविड-१९ साथीचे रुग्ण वाढतात. कोविड-१९ पॉझीटीव्ह रुग्णांना महानगरपालिकेच्या उपचार केंद्रावर रुग्णांचे घरापासून ने-आण करण्यांस महापालिकेने १०० रिक्षा भाडयाने घेण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे.

सदर रिक्षामध्ये व ॲम्बूलसमधील डॉक्टर परिचारिका यांना उपचार केंद्रावर सर्च करणे तसेच होम आयसोलेशन मध्ये असणाऱ्या रुग्णांवर लक्ष ठेवणे व त्यांची फोन वरुन माहीती घेण्यांस परिचारिकांना व डॉक्टारांना सिम कार्ड ६३ नग देणेबाबत उप आयुक्त वैद्यकीय आरोग्य विभाग यांनी मागणी पत्र दिले आहेत.

तसेच ड्राईव्ह ईन या मोहिमे अंतर्गत ४५ वर्षावरिल नागरिकांना कोविड प्रतिबंधक लसिकेंद्रावर लस देण्यासाठी ने-आण करण्यास ९ नग बसेस ची व्यवस्था केली असून बसमध्ये लसिकरण करण्यात येणार आहे. याकरिता बसमधिल लसिकरण करणाऱ्या डॉक्टर परिचारिका यांनाही मोबाईल व सिमकार्ड देण्याबाबत मा. उप आयुक्त वैद्यकीय आरोग्य विभाग यांनी सुचना दिलेल्या आहे.

वरिल कामासाठी एकुण ४२ नग सॅमसंग कंपनीचे मोबाईलची मागणी मा. उप आयुक्त वैद्यकीय आरोग्य विभाग यांनी केलेली आहे. सदर मागणीप्रमाणे १) सॅमसंग कंपनीचे मॉडेल क्र. M०१ Core मोबाईल बाजारामध्ये १८ नग उपलब्ध आहेत व कामासाठी ४२ नगाची आवश्यकता आहे. सदर मागणी प्रमाणे बाजारामध्ये चौकशी केली असता सॅमसंग कंपनीचे मॉडेल क्र. M०२ Core मोबाईल उपलब्ध आहेत. त्यामुळे एकुण ४२ नग खरेदी करण्यांस खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | मॉडेल क्र. | प्रति नगाचा दर | आवश्यक नग | एकुण |
|---|---|---|---|---|
| १. | M०१ Core | ५४४५/- + १८ % GST | १८ | १,१५,६५०/- |
| २. | M०२ Core | ७२०३/- + १८ % GST | २४ | २,०४,०००/- |
| | | | एकुण | ३,१९,६५०/- |

तसेच सदरचा खर्च सन २०२१-२२ मधील नैसर्गिक विभाग अंतर्गत नैसर्गिक आपत्ती इतर या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी महानगरपालिकेच्या फिरते लसिकरण केंद्र व कोविड रुग्णांचे उपचारार्थ असलेल्या डॉक्टर व नर्स इत्यादीसाठी सॅमसंग कंपनीचे मॉडेल क्र. M०१ Core १८ नग व सॅमसंग कंपनीचे मॉडेल क्र. M०२ Core २४

नग मोबाईल खरेदी करावयाचे असून त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा मे. स्वरा बायोमॅक्ट्रीक्स या कंपनीकडून विना ई-निविदा तात्काळ थेट खरेदी करण्यांस येणाऱ्या रक्कम रु. ३,१९,६५०/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठरावः- शहरामधील आढळलेल्या कोविड-१९ पॉझीटीव्ह रुग्णांना तातडीने संपर्क करुन उपचारासाठी महानगरपालिका रुग्णालयामध्ये दाखल करणे तसेच दैनंदिन होम आयसोलेशन मधील रुग्णांची चौकशी करणे या कामासाठी महानगरपालिकेचे डॉक्टर, परिचारिका यांना संपर्क करण्यांस तसेच नागरिकांनाही मदतीसाठी डॉक्टर यांचेशी संपर्क करण्यांस तसेच फिरते लसिकरण व त्याद्वारे कोविड रुग्ण आटोक्यामध्ये आणणेसाठी मे. स्वरा बायोमॅट्रीक्स हयाच्यांकडून विना ई निविदा तात्काळ थेट खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी सॅमसंग कंपनीचे मॉडेल क्र. M०१ Core १८ नग व सॅमसंग कंपनीचे मॉडेल क्र. M०२ Core २४ नग मोबाईल खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ३,१९,६५०/- (अक्षरी रुपये तीन लक्ष एकोणवीस हजार सहाशे पन्नास मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिक

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्र: ९४४ दिनांक: ३१/०५/२०२१

विभाग:बाजार लिलाव

**प्रस्तावाचा विषय :-** दि. ०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ (३वर्ष) कालावधी करीता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती- "जी" (वालीव) अंतर्गत गोखिवरे दैनंदीन बाजार फी वसुली करीता ठेकापध्दतीने देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-**

कामाचे नाव :- दि. ०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४(३ वर्ष) कालावधी करीता.वसई विरार शहर महानगरपाकलिका प्रभाग समिती "जी"(वालीव)अंतर्गत गोखिवरे दैनंदीन घाऊक बाजार फी वसुली करीता ठेका पध्दतीने देणेबाबत.

१. प्रशासकीय मान्यता :- प्रशासकीय ठराव दि ०१/०३/२०२१, ठराव क्र.५९४

२. ई- निविदा अंदाजे रक्कम :- रु.१,७३,१७,५८४/-

३. ई- टेंडरींग निविदा प्रसिध्दी
वृत्तपत्राचे नाव व दिनांक :-दै.लोकमत दि.०९/०३/२०२१
दै.आमची मुंबई दि. ०९/०३/२०२१
दै.यशोभुमी दि.०९/०३/२०२१

४. विहीत मुदतीत ऑनलाईन
प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :-०१

५. ई- टेंडरींग निविदा प्रथम मुदतवाढ
प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक:-दै.लोकमत दि.२४/०३/२०२१ ते दि.३०/०३/२०२१
दै.आमची मुंबई दि. २४/०३/२०२१ ते दि.३०/०३/२०२१

६. विहीत मुदतीत ऑनलाईन
प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :-०३

७. ई- टेंडरींग निविदा प्रथम फेर निविदा
प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक:-दै.जागल्या दि.०१/०४/२०२१ ते दि.०७/०४/२०२१
दै.आपला महानगर दि. ०१/०४/२०२१ ते दि.०७/०४/२०२१

८. विहीत मुदतीत ऑनलाईन
प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :-०४

९. निविदा स्वीकारण्याची दिनांक :- दि.०७/०४/२०२१

१०. निविदा उघडण्याची दिनांक :- दि.०८/०४/२०२१

११. प्राप्त निविदा उघडणारे
अधिकारी :- मा.उप. आयुक्त सो. (दै. बाजार फी )

१२. विहीत मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या असुन त्या उघडल्या असता लखोटा क्र. ०१ मध्ये मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्रे खालीलप्रमाणे सादर करण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | सनदी लेखापालने प्रमाणीत केलेली वार्षीकउलाढाल प्रमाणपत्र(रु.६५ लक्ष) | पॅनकार्ड आधारकार्ड | आयकर प्रमाणपत्र सन २०१९-२० | दै.बा.फी अनुभव दाखला | बँक सॉलव्हन्सी प्रमाणपत्र | प्रतिज्ञापत्र | पात्र / अपात्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाबा कंन्स्ट्रक्शन | √ | √<br>√ | √ | √ | √ | √ | पात्र |
| २. | रामकैलास यादव | √ | √<br>√ | √ | √ | √ | √ | पात्र |
| ३. | आर.एन.एन्टरप्राईजेस | √ | ×<br>× | √ | √ | √ | √ | अपात्र |
| ४. | आर.एस.एन्टरप्राईजेस | √ | √<br>√ | √ | √ | √ | √ | पात्र |

उपरोक्त तांत्रीक बाबींच्या कागदपत्रांची तपासणी केली असता. प्राप्त ०४ निविदाकारांपैकी ०१ निविदाकार आर.एन.एन्टरप्राईजेस यांनी पॅनकार्ड व आधारकार्ड सादर केलेले नाही. तसेच श्री.अब्बास एच. शेख यांनी दि.१५/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये श्री.आर.एन.एन्टरप्राईजेस बँक सॉलव्हन्सी व उलाढालाचे कागदपत्राच्या आधारे तेव्हा मी संबंधीत बँकेच्या मॅनेजर सोबत संपर्क साधले असताना. तसे आमच्या बँकेतून असले सॉलव्हन्सी इशु झाला नाही त्यामुळे बँकेतून संपर्क साधुन खात्री करावी अशी विनंती केलेली आहे. त्यानुसार संबंधीत बँकेस जा.क्र.वविशम/८५/२०२१/२२ दि.२३/०४/२०२१ रोजीच्या पत्राचा ई-मेल दि.२७/०४/२०२१ रोजी शाखा अधिकारी-कर्नाटका बँक, वर्तक नगर, ठाणे यांना ई-मेल पाठविण्यात आला होता.

त्यानुसार शाखा अधिकारी कर्नाटका बँक, ठाणे यांनी KBL/Thane/OR२२/२०२१-२२ दि.२७/०४/२०२१ रोजीचे पत्राचा ई-मेल प्राप्त झाला असुन मे.आर.एन.एन्टरप्राईजेस प्रोप्रायटर श्री.राजु डी. दबडे यांनी सादर केलेले बँक सॉलव्हन्सी सर्टीफेकेट हे आमच्या बँकेने दिलेले नाही. तसेच ज्या व्यक्तीने बँक सॉलव्हन्सी सर्टीफीकेट सादर केलेले आहे. त्या व्यक्तीची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. जेणे करुन आम्ही आमच्या वरिष्ठ कार्यालयास सादर करुन फसवणूकी बाबतची कायदेशिर कारवाई करु शकू असे सदर बँकेच्या पत्रात नमूद आहे. त्यामुळे मे.आर.एन.एन्टरप्राईजेस यांनी महानगरपालिकेच्या ई-निविदेमध्ये खोटी कागदपत्र सादर करुन महानगपालिकेस फसविण्याचा प्रयत्न केल्याचे सिध्द होत आहे.त्यामुळे मे.आर.एन.एन्टरप्राईजेस प्रोप्रायटर श्री.राजु डी. दबडे यांचे विरुध्द नियमानुसार कायदेशिर कारवाई जसे त्यांच्या कंपनीस काळ्या यादीत टाकण्याचे कारवाई करणे आवश्यक आहे त्यानूसार मान्यतेस सविनय सादर.

उर्वरित ०३ निविदाधारक बाबा कंन्स्ट्रक्शन, रामकैलास यादव व आर.एस.एन्टरप्राईजेस यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने ते पात्र ठरत आहेत. परंतु त्यापैकी ०१ पात्र निविदाधारक रामकैलास यादव यांच्या दि.२३/०४/२०२१ रोजीचे पत्र प्राप्त दि.२३/०४/२०२१ नुसार फेर निविदेमध्ये ०४ निविदा प्राप्त झाल्या असुन त्या मध्ये माझी ही निविदा असल्याने मी खालील कारणास्तव या निविदे मधुन माघार घेत आहे. याचे कारण असे की, आता कोरोना प्रादुर्भाव वाढल्याने शासनाने लॉकडाऊन केल्यामुळे महानगरपालिकेने दै.बाजार व आठवडे बाजार बंद केलेले आहेत. त्यामुळे बाजार फी वसुली होऊ शकत नाही. तसेच लॉकडाऊनचा कालावधी किती असणार आहे. याबाबत सुध्दा अनिश्चितता आहे. मागिल वर्षी सुध्दा दि.२२/०३/२०२० ते दि.३१/०७/२०२० (अंदाजे सव्वा चार महिने) लॉकडाऊन कालावधी मुळे दै.बाजार व आठवडे बाजार भरत नसल्यामुळे दै.बाजार फी ची वसुली झालेली नाही. याबाबत मा.आयुक्त यांना विनंती केली असता त्यांनी फक्त ०३ महिन्याचीच सुट/मुदतवाढ दिलेली असल्याने आमचे मागिल वर्षी सुध्दा आर्थिक नुकसान झालेले आहे. आता या पुढे लॉकडाऊनचा कालावधी बाबत सांगता येत नसल्याने व त्यामुळे बाजार फी वसुली करुन

महापालिकेस निविदेची रक्कम जमा करणे शक्य नसल्याने माझे आर्थिक नुकसान होणार असल्याने मी सदर निविदेत सहभाग घेवुन सुध्दा माघार घेत आहे. त्यामुळे माझी निविदा अपात्र ठरविण्यात यावी. ही आपणांस विनंती असे त्यांच्या पत्रात नमुद आहे.

त्यामुळे राम कैलास यादव यांच्या दि.२३/०४/२०२१ रोजीच्या प्राप्त पत्रानुसार निविदेमध्ये पात्र असुन सुध्दा त्यांना अपात्र करण्याबाबत त्यांनी केलेल्या विनंती नुसार त्यांना अपात्र करावे किंवा कसे याबाबतच्या टिपणी सादर केली असता मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी ई निविदेमध्ये सहभागी न होणे बाबत ठेकेदारानी लेखी विनंती केल्याने सदर निविदाकाराला गोखिवरे बाजार फी ठेका प्रक्रियेतून वगळण्यात यावे व इतर पात्र निविदाधारकांना संधी दयावी. असे अभिप्राय नोंदविलेले असुन त्यास मा.अति आयुक्त व मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

**निर्णय-: वरीलप्रमाणे प्रस्तावात नमुद प्राप्त निविदापैकी अनुक्रमांक ०१ व ०४ मधील निविदाधारक श्री. बाब कंन्स्ट्रक्शन व आर.एस.एन्टरप्राईजेस हे पात्र ठरवुन व अनुक्रमांक ०२ व ०३ श्री.राम कैलास यादव व आर.एन.एन्टरप्रायजेस हे अपात्र ठरविणेत येत आहेत. यास मान्यता देत आहे.**

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका